भास्कर हांडे

आपलेपणाचा

अनुक्रमणिका

१ एकोणिसशे ब्याऐंशी
२ मी ज्या देशात राहता
३ आभास अन् भास
४ संत साहित्यातील चित्रमयता
५ *मुलाखत*
६
७
८
९
१०
११
१२
१३
१४

एकोणिसशे ब्याऐंशी

एकोणिसशे ब्याऐंशी. जानेवारीचा महिना. थंडीचे दिवस. ॲमस्टरडॅम जवळच्या विमानतळावर (किपॉल) उतरून रेल्वेने द हेग या शहरात पोहोचलो. तपमान उणे पाच डिग्री होते. सर्वात प्रथम हॉटेल शोधणे होते. रस्त्यावर बर्फ पडला होता. हातात घेतलेल्या ओझ्याने बोटे आखडून जाऊ लागली. कोठेही हॉटेल मिळण्याची चिन्हे दिसेनात. सोबत आणलेल्या बॅगा प्रतिक्षा कक्षातील लॉकर्समध्ये कोंबून ओळखीचे पत्र घेऊन आलो होतो. त्या पत्त्याच्या शोधात निघालो. तेथे ट्राम चालू होत्या. आलेल्या पहिल्या ट्राममध्ये चढलो. ट्रामचालक आपल्याच रंगाचा काळे केस, ब्राऊन चेहरा. इंग्लीशमध्ये त्याला कागदावरचा पत्ता विचारला, तर तो हिंदीत बोलू लागला. त्याने तो हॉलंडमध्ये कसा आला हे तीन चार वाक्यात सांगून टाकले. ''हमारे दादा परदादा सुरिनाममें (हॉलंडची एकेकाळची कॉलनी) आये थे. उनके हम पामें है।'' मी आपला विचार केला काल मी दिल्लीत होतो तिथे मराठी बोलणारा ड्रायव्हर होता. आज मी हेगमध्ये आहे. येथे हिंदी बोलणारा भैय्या भेटला. मी विचार केला होता की अशा देशात जायचे की जेणेकरून मी उच्चारलेला शब्द समोरचा समजू शकणार नाही. किंवा भारतीय भाषा बोलणारा व इंग्रजी ज्यांची मातृभाषा अशा देशात जायचे नाही. डच बोलणारा हॉलंड निवडला होता. लिंग्वाफोन या कंपनीकडून भाषा शिकण्यासाठी संपूर्ण कॅसेटचा सेट खरेदी केला होता मुंबईलाच. त्यावेळेला सोनीचे हेडफोन नवीनच आले होते. कॅसेट त्याच्यात लावून स्पीकर्स कानात लावून बसमध्ये ऐटीत जायचा. ड्रायव्हरशी हिंदीत बोलून त्याने योग्य त्या स्टॉपवरती उतरवले. पत्ता शोधण्याच्या पध्दतीमुळे एका ठिकाणी विचारून ताबडतोब नंबरद्वारे मिळाला. त्या मुलीच्या बापाने तिच्यासाठी चिठ्ठी दिली होती. ती तिला सुपूर्द केली. तिला हॉटेल मिळविण्यासाठी फोन्स करायला लावले. हॉटेल काही मिळाले नाही.

शेवटी पुन्हा स्लूशनच्या परिसरात येऊन राहण्याची व्यवस्था पाहू लागलो. पाच वाजता हॉटेल लिमबर्ग मध्ये एक रूम मिळाली. हॉटेल तसे लहानच होते. एक म्हातारा म्हातारी चालवत होते. त्या रात्री रूममध्ये घुसून बिस्तरावर चादरी लपेटून झोपी गेलो. दोन दिवसांचा थकवा अंगावर होताच. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. नाश्ता झाला. तो फस्त करून ॲकेडमीचा पत्ता दाखवून कोणत्या दिशेला किती दूर वगैरे विचारपूस केली. तर जवळच्याच अंतरावर आहे असे समजले. बाहेर पडून स्टेशनसमोरून ट्राम पकडून कॉलेजवरती (ॲकेडमी) हजर झालो. आश्चर्याची गोष्ट होती ती ही की मी दरवाजा ठोठवून डायरेक्टरच्या टेबलासमोर जाऊन उभा ठाकलो. ओळख झाल्यावर त्यांचे कुतूहल त्यांनी बोलून दाखविले. तसेच सांगितले की

आजवरच्या अॅकेडमीच्या इतिहासातील भारतातून आलेला पहिला विद्यार्थी. अॅकेडमीला नुकतीच ३५० वर्षे साजरी करून झाली होती. नंतर डायरेक्टर जे. ब्रेस्कॉटन यांनी माझी काम करण्याची जागा व थोडक्यात वर्ग दाखविला. वर्गात पाऊल ठेवताच त्या भव्य जागेची कल्पना आली. वातावरण एकदम वेगळे होते. मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त होती. डायरेक्टर, शिक्षकांशी ओळखी करून देऊन गेला. काही माहिती पाहिजे असल्यास त्याच्या रूममध्ये येण्यास सांगितले. इतक्यात एक विद्यार्थी पुढे पाऊल ठेवून स्वत:हून ओळख करून देऊ लागला. फॉलकर्ट कोमुले. भास्कर हांडे भारतातून आलो आहे. नंतर बाकीचे बोलणे इतरांच्या ओळखी. माझ्या वर्गात जॅकोलीन आणि नोतिक ह्या दोन मुली आणी मी असे तिघेजण पाचव्या वर्षात एकूण चार मुली, तिसऱ्या वर्षाच्या वर्गात फॉलकर्ट पिम आणि हस असे तिघे. दुसऱ्या वर्षात पहिल्या वर्गातील मुले मुली इतरत्र होती. पहिला दिवस ओळखीतच गेला.

संध्याकाळपर्यंत पोलीस स्टेशनला हजेरी लावून आलो. तसेच स्वतंत्र रूम मिळण्यासाठी नाव नोंदवून आलो. भारतातील विद्यापीठाच्या किंवा अॅकेडमीमधील हॉस्टेलमध्ये उतरता येईल या कल्पनेला तडा गेला. येथील कोणत्याही विद्यापीठात किंवा अॅकेडमीत विद्यार्थ्यांची वसतीगृहे नाहीत. विद्यार्थ्यांच्या सांघिक संघटना वगैरे आढळल्या नाहीत. दिवसभरात पायपीट करून शेवटी चार वाजता अंधार पडायला लागला त्यावेळेस नाव नोंदवलेल्या ठिकाणाहून ताबडतोब एका खोलीचा पत्ता मिळाला होता तिथे जाऊन आलो. फालीयान्त लान या रस्त्यावरील एकशे एक नंबरची खोली. पत्ता शोधताना समजले की रस्त्याच्या एका बाजूला सम आकडे घरांना दिलेले असतात तर दुसऱ्या बाजूला विषम आकडे दिलेले असतात. रूम पाहता पाहता सहा वाजले. अगदी अंधार झाला होता. रस्त्यांची माहिती नव्हती. आल्या रस्त्याने पुन्हा परत जात होतो. चुकण्याचा अंदाज घेत होतो. एकतर पूर्ण अनोळखी शहर. पत्ता अचूकपणे शोधण्याची सवय झाली होती अगदी मुंबईपासून. शहराचा अंदाज घेत घेत प्रवास करत होतो. ठिकठिकाणच्या खुणा डोळ्यात साठवून ठेवत होतो. चुकायला नको ह्यासाठी. आल्या रस्त्याने पुन्हा हॉटेलमध्ये पोहचलो. रस्त्यावर चालता चालता जे काही खायला मिळाले होते ते खाऊन घेतले होते. थंडी असल्यामुळे पोटात आतडी आकुंचन पावली होती. ह्या सर्व गोष्टींमुळे संध्याकाळच्या जेवणाची आवश्यकता भासली नाही व हॉटेलमध्ये जाऊन झोपलो.

मी ज्या देशात राहतो

मी ज्या देशात राहतो त्या देशातील कौटुंबिक संस्था ही मोडकळीस आली आहे किंवा अस्तित्वात नाही. याचा विचार करण्यापेक्षा किंवा असे म्हणण्यापेक्षा तेथील कुटुंब कोणत्या आकारात आहे, कशा स्वरूपात ते अस्तित्वात असते, कुटुंबातील प्रमुख आई किंवा बाप त्यांना जन्म दिलेली व जोपासलेली मुलं ही वयाच्या १६ ते २० या वयात स्वतंत्र रूम शोधून राहायला लागतात मग मुलगा असो वा मुलगी त्यात अंतर नाही. ज्या दिवसापासून ते वेगळे राहतात त्या दिवसापासून त्यांचा मातापित्याच्या घरात आल्यावरची प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा वेगळा होतो. हे सर्व माझ्या बापाचेच आहे ही कल्पना तिथे मुलामध्ये जोपासली जात नाही. याच्या व्यतिरिक्त असे म्हणता येईल जेव्हा मातापिता मुलांना सांगतात किंवा अनुभवतात. घरातील जे काही आहे ते वैयक्तिक खरेदी केले आहे. बाप हा हे दाखवून देतो की हे सर्व माझे आहे. जर माता कर्ती असेल तर ती ही हीच भावना जागवते. याचा परिणाम मुलगा किंवा मुलगी हे स्वतंत्र राहताना तसेच भावना घेऊन दुसऱ्याशी वागतात. या प्रकारातून एकदा ही व्यवस्था तयार होणे यावर (आर्ग्युमेंट) बोलाचाली हात नाही. हे माझे आणि ते तुझे किंवा हे माझे नाही अन् ते तुझे आहे. त्यातून प्रथम काय काय माझे आहे या शोधात मुलं राहतात. मग या माझेपणात माया, प्रेम, दररोज व्यवहारातील देवाणघेवाण, चालणे बोलणे वगैरे सर्व काही सामावून जाते व एक वेगळी मीपणाची चाल पडते. त्याला आपण भारतीय वेगळे म्हणतो. यापुढील पायरीमध्ये आई वडील, मुले मुली यांचे जीवन वेगळे होते. रोजच्यासारखे होत नाही. आईवडिलांना स्वतंत्र वेळ मिळतो. मुलामुलींना त्यांच्या वयोमानाप्रमाणे मोकळीक मिळते. यात आईवडिलांचा विचार केला तर त्यांचे वैयक्तिक स्वातंत्र्य, वयोमानाप्रमाणे वाढणारा एकलकोंडेपणा, त्याच त्याच पणाचा आलेला वीट, संबंधातील तेढेपणा, आयुष्यात गमावलेल्या संधींचा भास, त्यांचा पुर्नशोध. असे अनेक विषय, यात पुन्हा अडकून घेण्याची इच्छा या गोष्टीसाठी स्वतंत्रता मिळते. मग त्यांच्या आयुष्याचे एक वेगळे पर्व चालू होते. काहींची सुरूवात ऐनवेळी होते तर काहींची अगदी विचारपूर्वक होते. हा प्रकार वेगवेगळ्या दृष्टीकोनातून होतो. त्याचे प्रमाण शतकाच्या सुरुवातीला कमी होते. पहिल्या महायुद्धातील अनुभवातून थोडीशी व्यवस्था सुटी झाली. पहिल्या अन् दुसऱ्या महायुद्धातील काळ हा युरोपातील काही देशांना ताणाताणीचा गेला. त्याच तणावातून त्यांच्या सरकारांनी केलेली वाटचाल दुसऱ्या महायुद्धात अगदी तिमाही, सहामाही व वार्षिक परीक्षांसारखी पणाला लागली व तिचा निष्कर्ष निकाल हा आज हाती आला आहे असे वाटते. पहिल्या महायुद्धातील मुत्सद्यांनी दुसऱ्या महायुद्धावेळी

सामाजिक कायदे केले. दुसऱ्या महायुद्धातून पोळून निघालेल्या मुत्सद्यांनी आणखी त्यात सुधारणा करून पुढे चालवले. त्यात कॉलनीवरून आलेले आर्थिक बळ व सामाजिक स्थैर्य. सर्व पणाला लावून देशाचा वैयक्तिक विकास करण्याच्या कामाला आले. त्या विकासाच्या प्रकियेतून आलेली सामाजिक क्रांती, स्त्री स्वातंत्र्य काम करून आलेली मरगळ, कामामुळे वेळअभावातून जोपासलेली रेखीव आयुष्य व त्याला मिळालेली आर्थिक मुबलकतेची जोड. सरकारी कचेरीत आलेला अमाप पैसा त्यांचा सुधारणेवर दिलेला भर प्रत्येक क्षेत्रात दिलेली सरकारी अनुदाने अगदी वैयक्तिक ते. कलेक्टीव्हजना, संघटनांना वेगवेगळ्या प्रकारे मनात रूजवलेल्या गोष्टी हे माझे आहे आणि ते तुझे यांचा प्रत्यय घेत. अगदी विवाहबाह्य संबंधातील जन्मलेला समाज एका बाजूला उभा केला आणि त्याच्या विरोधाभासात इटली, स्पेन, फ्रान्स येथील कॅथॅलिक समाज उभा आहे. अन् भारतात या गोष्टीचा तर उच्चारसुद्धा नकोय. जागतिक प्रमाणावर पाहिले तर संख्या कमी वाटेल. किती प्रकारची सरकारे या सामाजिक अवस्थेला थारा देतात. पुढाकार घेऊन बिले पास करतात. अर्थात बिलाव्यतिरिक्त काही समाज तयार आहे पण तो मान्यवर स्थितीत नाही.

ही झाली पार्श्वभूमी. जेथे आज मी जगतो, माझ्या समान वयाची माणसे आणि दहा ते पंधरा वर्षांच्या फरकाने जन्मलेली मुले मुली यांच्यात पुन्हा फरक जाणवतो आहे. शिवाय व्यवसायाच्या दृष्टीने भेटलेल्या संबंध आलेल्या वेगवेगळ्या वयोगटातील माणसे. यांच्यातील संवाद असे बोलतात की माझ्या बापाने लढाई केली मी केली नाही. तो माझा दोष नाही. यात माझे तुझे पणाचा दुसरा भाग पाहावयास मिळतो. यातून पुढे आलेले सामाजिक कार्यकर्ते, सरकारी प्रवक्ते, राजकारणी यांचा बदलता समाज तयार झाला आणि होत आहे.

आभास अन् भास

आभास अन् भास ह्यांच्या दोलायमान अवस्थेचे रूप समजणे कितपत शक्य आहे. प्रेरणेचा उगम शोधणे अन् त्या उगमाचा स्त्रोत वाहून चित्रामध्ये अडकून ठेवणे ह्यामधील उलाघाल कृती करण्यास उद्युक्त करते. सारखे टोचत राहणे, सलत राहाणे, उकळत राहाणे, काहीतरी करावेसे वाटणे, ह्या प्रेरणेच्या कृती कर्मप्रवृत्ती आहेत. त्यापासून काहीतरी उत्पादीत, अंकीत करत रहाणे हे प्रेरणेचे फलित असते.

प्रेरणा ही शक्ती आहे असे आध्यात्मिक बोलणे खरे असले, परंतु ते कलाकाराला त्यातल्या त्यात दृक्कलाकाराला कोणत्या प्रकारे कार्यान्वित करते याचे स्वरूप विश्लेषनात्मक मांडता येत नाही. जसे वाङमयातील भाषांतरात शब्दार्थांचे प्रचंड घोळ होतात अन् अर्थाचा अनर्थ तयार होऊन तो रूढ झाल्यावर संस्कृतीचा, भाषेचा अर्थ वेगळा होऊन रुढ होतो. उदा. देव या शब्दाचे भाषांतर हे फक्त GOD एवढेच घेऊन झालेली भाषांतरे अन् GOD शब्दाच्या अवतीभोवतीची वलये यामुळे तुकाराम समजणे कठीण होते. ते सुलभ न होता जास्त अनाकलनीय झाले. धर्माच्या तराजूतील वजनाचे माप झाले.

देव ह्या शब्दाची उत्पत्ती अन् उपयोग जेव्हापासून चालू झाला त्यावेळेपासून त्याचे अर्थ वेगवेगळ्या प्रकारे प्रत्येक जण घेत गेला. पुढेही सांगत गेला. संस्कृतातील अर्थ प्राकृतात पुढे चालू झाले. तुकोबांसारख्या शब्द चाणाक्षाने वापरणाऱ्या कवीमाणसाने त्यांच्या काव्यात विठ्ठल, देव, विठोबा, विठाई, विठू, मुरारी, केशव, माधव, नारायण, पंढरी अशी वेगवेगळी योजना केली. ती त्यांना अभिप्रेत असलेला माणसातील प्रेमनात्यातील देव शब्दाची व्याख्या म्हणून होती. उदा. मित्र, राजा, पाहुणा, राक्षस इ.

तुकाराम महाराजांनी अभंगात योजलेले प्रसंग, विषय, संदर्भ, शब्द हे समाजाशी जितके जवळचे मिळतेजुळते आहेत ते भाषांतर करताना परभाषेतील विद्वान समतोल न राखता फक्तच देव या शब्दाचा अर्थ GOD लावून संपूर्ण काव्याचा अर्थ लावतात.

या प्रकारचे मुद्दे परदेशात जेव्हा तुकाराम पाहीला जातो तो कविता न पाहता एक धर्मप्रचारक असा विद्वानाचा रोख असतो. त्यामुळे धर्मप्रचार विषयाकडे लोकांचे लक्ष वेधले जाते. त्यात स्वधर्माचे ज्ञान असण्याची ओढ व परधर्माचा प्रचार याची सांगड सहसा बसत नाही. त्याला विरोध होणे चालू होते. धर्मप्रचार माणसांचा वेडेपणा थोडावेळ थोपवला तरी तो तुकारामातील माणूस समजून घ्यायला तयार होत नाही. फक्त तो दुसऱ्या धर्मातील आहे. तो धर्म वेगळा. उदा. कॅथलिक विद्यापीठ, समाजवादी विद्यापीठ, प्रोटेस्टट विद्यापीठ. या विद्यापीठांमध्ये

शिकविणारे प्राध्यापक, त्यांचे शब्दकोडे अन् त्यांची भाषांतरे, अन् त्यांच्या परदेशी भाषांचे ज्ञान, त्यांना उपलब्ध असलेली तुकारामाची आजवरची भाषांतरे; संस्कृत भाषेचे ज्ञान, कारण परदेशी विद्यापीठांमध्ये प्रथम संस्कृत भाषा नंतर प्राकृत व (प्रांतीय भाषा) यांचे ग्रंथ यांच्याद्वारे माहिती परंतु प्रांतीय भाषांचे ज्ञान गेल्या पन्नास वर्षातील विद्यापीठामध्ये फार कमी आहे. याची दखल घेतली पाहिजे अन् पुढे ते उपलब्ध करू दिले पाहिजे. वार्स्वा सारख्या विद्यापीठामध्ये भरपूर पुस्तके फक्त संस्कृत व काही वेगळ्या भाषेची आहेत. शिवाय रशियातील पुस्तकांचा भरणा झाला आहे. शिवाय प्रत्येक विद्यापीठातील प्रोफेसर आपली एखाद दोन पुस्तके विद्यापीठातर्फे छापून लायब्ररीमध्ये टाकतो. यात भाषेचेही अर्थ बदलून गेलेले असतात. जसा शेक्सपिअर भारतीय विद्यापीठामध्ये पी.एच.डी. च्या गराड्यात बसला आहे.

धर्मप्रचार आणि वाङ्मयप्रचार यात फरक आहे. आजच्या जगात धर्मप्रचार करण्याचा फायदा काही नाही. प्रत्येक धर्माचे ज्ञान आवश्यक तेवढे सामान्य माणसापर्यंत पोहचत आहे. मात्र वाङ्मयप्रचार धर्माय अंग न घेता वाङ्मय म्हणून पाहीले पाहीजे. त्यातल्या त्यात काव्य प्रकारातील तळमळ समजून घेऊन गद्यासारखे भाषांतरात हाताळणे फार धोक्याचे आहे. हे इशारे सतत प्रश्नांद्वारे समोर येत राहत तेव्हा मराठीतून जेव्हा पहिली जी काही भाषांतरे आहेत त्यांचा उलगडा करणे क्रमप्राप्त आहे.

दुसरीकडे धर्म एक अन् धर्माची एकच भाषा. अशा अवस्थेत धर्म अन् भाषा समजताना लोकांना पूवग्रहांकित ज्ञानांचे वापर करून दुसरी भाषा समजून घेतात.

संत साहित्यातील चित्रमयता

यदक्षरमनाख्येयमानंदमजमव्ययम्
श्रीमन्निवृतिनाथ इतिख्यातम् दैवतभाश्रथे.

अविनाश अक्षर शब्दानी वर्णन करता येत नाही, ज्याची व्याख्या होत नाही असे जे काही आहे, केवळ आनंदमय जन्मरहित अव्ययी.

ही जी काही अक्षरे शब्दांकित केलेली आहेत, या शब्दांना आकार नाहीत. ते साकार होत नाहीत. दृष्यरूपाच्या कोणत्याही नजरेच्या टप्प्यात येत नाहीत तरीही ती चित्रमय अक्षरे होतात.

गुरू संकल्पनेच्या रूपात ज्ञानदेवांनी पाहिलेले – वर्णन केलेले निवृत्तिमहाराज हे मानवी देह धारण केलेले जडत्व रूप होते. ती एक शिल्पाकृती आहे. जसे एकलव्याने गुरूनी आपल्याला विद्या शिकवावी यासाठी द्रोणाचार्यांचा पुतळा उभा केला. इथेच भक्तीसंप्रदायातील चित्रमयतेला सुरुवात झाली होती. ज्ञानदेवांना गुरू हे साक्षात निवृत्तिनाथाच्या सहवासातच मिळाले. गुरू संकल्पना सांगताना ज्ञानदेवांनी अनुभवामृतात ज्या ब्रह्मवस्तुला नमस्कार केला आहे ते सर्व सृष्टीचा आदी, अंत, उत्पत्ती, स्थिती, नाश यांची अधिष्टाची देवता (ब्रह्मा, विष्णु, महेश रूपे) असून ही त्याला स्वत:ला आदी, मध्य अंत नाही. ही विरोधी रंगसंगती सांगायला सूर्य प्रतिभा पुरी आहे. एक बिंदू पुरा आहे. ही ब्रह्म वस्तू जी काही आहे त्याचे रूप काय आहे ? आकार काय आहे ? असे चित्रमय भाषेत विचारता येईल.

मुलायाग्राय मध्याय मुलमध्याग्रमुर्तथे
क्षीणाग्रमूलमध्याय नम:। पुर्णाय शंभवे ।।

मानवाकृतीचे उदाहरण हे चित्रमय परिभाषेतील व्यंजने आहेत तर हावभाव हे स्वर आहेत. मानवदेहाच्या हालचाली रेखाटणे किंवा शिल्पाकृती उभी करणे म्हणजे चित्रशिल्प विषयाची मुळाक्षरे गिरवणे आहे. यथार्थ चित्राचा हा विषय एकलव्यानी तसेच ज्ञानदेवांनी दाखवून दिला आहे. मात्र ज्ञानदेवांच्या समकालीन तसेच नंतरच्या संतांनी भक्तीपरंपरेत भाषेचा वापरर चित्रांची गाठोडी बांधण्यासाठी केला आहे. तेराव्या शतकानंतरच्या सर्व संतांची भाषाच चित्रमय आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. याची उदाहरणे संतसाहित्यात पदोपदी येतात. चित्रकलेचे प्रत्येक अंग यथार्थचित्र, निसर्गचित्र, व्यक्तीचित्र, रेखाचित्र, मुक्तहस्तचित्र, अमुर्तचित्र, भित्तीचित्र, प्रासंगिक मांडणी, शिल्प यांची विषयवार माहिती संतांच्या लिखाणात आहे. कलेच्या सर्व

अंगाची-विषयांची माहिती असणारे साहित्यिक आजच्या शिक्षणक्षेत्रात किती आहेत ? हा प्रश्न सध्यातरी भेडसावणारा आहेच परंतु सर्व विषयांची जाण असणारे कलाशिक्षक शिक्षणक्षेत्रामध्ये किती प्रमाणात आहेत हे कलाक्षेत्रात असलेल्या कलाकारांच्या कमतरतेतून जाणवते. हा एक प्रकारे परंपरेचा तोटा आहे व संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. संतांनी लोककलेचे जतन त्यांच्या साहित्यातून करून ठेवले आहे. आपण डोळसपणे ते पाहणे, त्यातून प्रेरणा घेऊन नवनिर्मिती करणे ही कलावंताची सांस्कृतिक जबाबदारी ठरू शकते.

पांडुरंगाची व्यक्तिचित्रे किती वेगळ्या पध्दतीने वर्णन केलेली आहेत. पांडुरंगाचे प्रत्येक रूप हे त्याचे व्यक्तिशिल्प किंवा व्यक्तिचित्र होते. आजवर जितके अर्धपुतळे गेल्या पन्नास वर्षात निर्माण केले आहेत त्याच्यापेक्षा नक्कीच विठ्ठलाची पांडुरंगाची रूपे जास्त आहेत. प्रत्येक कलाकाराने हे अभंग जाणून घेतले तर व्यक्तिचित्रांचे व व्यक्तिशिल्पाचे जे काही विडंबन चालले आहे ते थांबून चित्राचित्रातील, शिल्पाशिल्पातील नाविन्य तुम्हाला समजून येईल.

१) सुंदर ते ध्यान । उभे विटेवर
कर कटावरी ठेवुनिया ॥

२) समचरण दृष्टी विटेवरी साजिरी
तेथे माझी हरी वृत्ति राहो ॥

३) स्वामी तु ही कैसा । न पडसी डोळा
सुंदर सावळा घवघवती ॥

४) पांडुरंग बाळ मुर्ती । गाई गोपाळ सांगाती
येऊनिया प्रिती उभे समयि राहिले ।

५) रूप पहाता तरि डोळसू । सुंदर गोपपणाचा वेषु

६) दोवरी दोन्ही भुजा । आलो घेऊनी
आलिंगवया लागुनी तयाचे अंग ।

७) कटावरी ठेवुनी हात । जना दावी संकेत
भवजलाब्धीचा अंत । इतुलाची

८) तो हा देवाधिदेव बरवा । पांडुरंग सदाशिवाचा निज ठेवा
बापरखुमादेवीवरू पंचविसावा । चोविसा मुर्तीवेगळा

एका रूपाची, पुतळ्याची, मुर्तीची अनेक वर्णने करणे जसे कविचे कार्य आहे तसेच एका काव्यातून अनेक पुतळे तयार करून दाखविणे किंवा चित्र काढून दाखविणे हे कलाकाराचे काम आहे. संतांनी साहित्यात सर्वच विषय पेरून ठेवले आहेत. त्याची रास करून पिक घरात आणणे व पुन्हा बियाणे काढून पुढच्या सुगीला बांधून ठेवणे हे आजच्या व नंतरच्या साहित्यिक कलाकारांचे काम आहे. संतसाहित्यातील ठेव गेल्या दोन शतकात जाणकार साहित्यिक व कलाकारांना दिसायला धुकं पसरले होते की काय असे मागे पाहिल्यावर वाटते. कलाकारांनी मात्र अंधारातच सतत वाटचाल केली. आपल्या परंपरेची रस्ता सोडून दुसऱ्या संस्कृतीचा महामार्ग पकडला.

चित्र काढणे ही कारागिरी आहे. चित्राचे विषय हे मात्र उपजत तसेच काल्पनिक असतात. शिल्प तयार करणे शिकण्यातून तसेच सरावातून येते. परंतु कसे शिल्प कोरावे किंवा साकार करावे हे याची मांडणी शिल्पकाराची स्वत:ची असावी. या विषयात जगणे आधी की कला आधी असे वाद आहेत. त्याचे उत्तर काळाने दिले ही आहे फक्त ते मान्य करणे प्रत्येकावर अवलंबून आहे.

साहित्य, काव्य व कला हे वेगळे विषय नाहीत. हे संतसाहित्याचा अभ्यास करताना व कलावंत म्हणून जीवन जगत असताना समजून येते. तर मग व्यक्तिविकासाचे इतिहास लिहिणाऱ्यांनी असे परस्परविरोधी पात्र उभी करून साहित्य वेगळे अन् कला वेगळी असे म्हणणे म्हणजे संस्कृती व परंपरेची तोडमोड करून ठेवणे असे आहे.

तेराव्या शतकापासूनचे संतसाहित्याचे शिल्प बहिणाबाईंनी वास्तूशास्त्राच्या भाषेत लिहून ठेवले आहे. अद्याप एकाही वास्तूशास्त्र झाला त्याची महती समजली नाही किंवा कोणत्याही शिल्पकाराला त्याचे वास्तव निर्माण करता आले नाही. हीच खेदाची गोष्ट महाराष्ट्राच्या शिल्पपरंपरेत आहे. महाराष्ट्रातील शिल्पपरंपरा फार उच्च कोटीची आहे हे आजही पाहायला मिळते. परंतु नवनिर्मितीचा मार्ग तेराव्या चौदाव्या शतकातच खुंटला गेला तो विसाव्या शतकात अर्धपुतळ्यांनी मोकळा करून दिला असे म्हणावेसे वाटते. एलफंटापासून ते वेरूळ अजंठ्यापर्यंत मधल्या पट्ट्यात कार्ला-भाजे. भुलेश्वर सह्याद्रीतील अनेक लेणी प्रेरणेसाठी आहेत परंतु भक्तीसंप्रदायाचे मंदिर उभारायला साक्षात कलाकारांची कमी आहे. घाट बांधायला पाथरथ फार आहेत. खांब कोरायला कल्पकांची राळ आहे. येथे संगमरवरात मंदिरे उभी राहतील अगदी सिमेंटमध्येसुद्धा परंतु सह्याद्रीच्या दगडाची घडण करायला कलाकार परप्रांतातून आणावे लागतील अशी आजची स्थिती आहे.

हे फक्त संप्रदाय, शिक्षणपद्धती, साहित्य यावर भर असलेली पध्दती पुढाकाराने कॉम्प्युटर बसवतील त्यावर चित्र काढण्याचा प्रयत्न करतील परंतु वास्तववाद समजायला त्यांना पाश्चिमात्य कलाकृतींचा आधार घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत साहित्य वेगळे आणि कला वेगळी असे सांगणारे महाराव तयार होत आहेत याची दखल घेतली जावी.

संतकृपा झाली । इमारत फळा आली
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार
जनार्दन एकनाथ । खांब दिल्हा भागवत
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश
बहेणी फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा

बहिणाबाईनी भक्ती संप्रदायाचा अगर भागवत धर्माच्या मंदिराचे मॉडेल बनवून ठेवले आहे. त्याला अद्याप बिल्डर, कॉन्ट्रॅक्टर, स्पॉन्सर मिळाला नाही. कलेला जनसामान्यापासून दूर ठेवण्याचे प्रकार सतत होतात. कवींचा सुकाळ झाला असे म्हणतील परंतु चित्रकारांची वाण आहे हे परंपरेने उभे केलेले विदारक चित्र आहे. कवि अन् चित्रकार वेगळे नाहीत परंतु कविने आपल्यातला चित्रकार व्यावसायिक दृष्टीने डांबून ठेवला हे गेल्या शतकावर नजर फिरवल्यावर

समजून येईल.

नाथांची चित्रशैली भित्तीचित्रातून जास्त व्यक्त होत आहे. त्यांनी पौराणिक प्रसंगांचे वर्णन भागवत धर्माचे वर्णन केले. त्याचबरोबर खालीलसारख्या पदांनी त्यांच्यातील चित्रकार पुढे येतो. त्यांच्या पदाची चित्रमयता किती दृश्य स्वरूपात आहे हे प्रत्ययास येते :

मळा शिपावया लागुनि । मोहपाट उपाय दोन्ही
मोटा काढीजे विहीरवणी । बहुत कष्टोनी अतिअल्प
मोहनाडा बैलजोडी । अखंड झोडता आमडी
येता जाता ओढाओढी । भोय भिजे थोडी भाग एक
तेथ ही मोट फुटे का नाडा तुटे । वोडव पडे बैल अवचटे
तरी हाता येता पीक आटे । बोल तुटे तात्काळ
तैसा नव्हे सरितेचा पाट । एक वेळ केल्या वाट
अहर्निशी घडघडाट । चालती लोट जीवनाचे

भक्तीचा महिमा सांगता सांगता एकनाथांनी शेताचे एक संपूर्ण चित्र रेखाटले आहे नदीच्या पात्रासहित. चित्राचे शद्बांकन केले आहे. तसे हुबेहुब चित्र चित्रकाराने रेखाटले तर एकनाथ काळाचे माध्यम होतात. गेल्या पाच शतकात शब्दातून त्या चित्राची मांडणी, आशय जशाचा तसा आहे. मोहनाडा, बैलजोडी, आसुड ओढाओढी, मोहपाट, विहीरवणी कितीतरी विषयसुची वस्तू साहित्य डोळ्यासमोरून सरकतात ह्याची साधारण मांडणी केली तरी भित्तीचित्राचे किंवा मुद्राचित्राचे चित्रण होते. अशाच प्रकारचे नामदेवांनी पंढरीच्या वारीच्या सोहळ्याचे वर्णन केले आहे.

कार्तिकी एकादशी । पोहा मिळाला पंढरीसी
तेथील महिमा वर्णु कैसी । ब्रह्मादिका न वर्णवे
दिंड्या गरूड टक्यांचे भार । वैष्णव नाचती जयजयकार
मृदंग वाजती अपार । नादे अंबर गर्जतसे

यथार्थ रूपाची ही चित्रमयता शब्दांमध्ये आहे तशी पकडून ठेवली आहे, मांडून ठेवली आहे. प्रत्येक कलाकारानी पाहिजे तशी मांडणी करावयाची आहे व तिथे सार्थरूप शोधायचे आहे. ही प्रेरणांची मैदाने मोकळी आहेत. त्यात रंगानी खेळायचे की रेषांनी जखडून घ्यायचे हे आव्हान प्रत्येक कलावंतानी स्विकारायला हवे साहित्यिकांनी त्याचा धिक्कार करून चालणार नाही.

आतापर्यंत एक सर्वसाधारण चित्रकलेच्या अंगानी यथार्थ स्वरूपातील ओव्यांचा, पदांचा, अभंगांचा पडताळा पाहिला मात्र अमुर्त कला समजावून घ्यायची असेल तर मराठी कलाविद्याचा अभ्यास करताना अनुभवामृत व तुकारामांची गाथा यात सर्वत्र कल्पनांचा संचार झालेला आहे तो ओळखणे आणि पुढे त्याची स्वतंत्र मांडणी करणे ह्यात रंगांचा, रेषांचा प्रादुर्भाव जास्त आहे तसाच कलावादाचा प्रत्यय सतत येत राहतो. अनुभवामृतातील काही उदाहरणे खरोखरच अमुर्त आहे.

जैसा सुर्य मिरवे प्रभा प्रभे सुर्यत्वाचाचि गाभा
तैसि भेद गिळीत शोभा । येकचि जया

ह्यात रंगाचे समीकरण हाय की मध्ये काढलेले चित्र डोळ्यासमोर उभे राहते. फक्त पिवळ्या रंगामध्ये त्यात छटा मिळवायच्या हे कलाकाराच्या मानसिक मेहनतीवर अवलंबून आहे.

का बिंब प्रतिबिंबाद्योतक प्रतिबिंब किंवा अनुमापक
तेविं द्वेतमिसें जे येक । मिरवत असे

प्रतिबिंबाला प्रकाशित करणारे बिंब असते आणि प्रतिबिंबावरूनच बिंबाचे अनुमान/कल्पना करता येते. यात द्वैत अद्वैत्वाचे सादृष्य दाखविले आहे. हे शिल्परूपाने दाखविता येईल. तसेच कलावादाच्या निरनिराळ्या चित्रशैलीमध्ये चित्र रंगवता येईल.

मामांचिया त्रिपुटीया । प्रणऊ केला चिरटिया
किं णकार तीरे घटिया । भेदवला काई

ॐ मध्ये अ, ऊ, म अशा तीन मात्रांचा समुदाय आहे. ण हे अक्षर तीन रेघांचे आहे. म्हणून णकारात भेद का आहे. ह्या ओवीत रेखांकनाने काढलेले रेखाचित्र समोर उभे राहते.

जैसे दर्पणाचेनि लागे । प्रतिबिंब बिंबी दिगे
का बुडी दीजे तरंगे । वायुचा ठेला

ह्यात आरसा व वारा तसेच बिंब प्रतिबिंब, पाणी व तरंग असे दृश्य व अदृश्य विषय आहेत. ह्यातून जर चित्र तयार झाले तर ते कलावंतांच्या प्रेरणेला आव्हान देत राहील. प्रेरणेची अवस्था कळत नकळत ओवीसारखी होते. जशी वारा शांत झाला म्हणजे तरंग पाण्यात बुडतो. चित्र तयार झाले म्हणजे प्रेरणा चित्रात सामावते.

आकाश हे सावेव । बांधे आकाशाची हाव
ते कोण्ही येक भरिव । आकाश जे

ह्या ओवीवरून अवकाश शिल्पाचा साक्षात्कार होतो. शिल्पामध्ये अवकाशाची आखणी असते. पोकळीचा अन् आकाराचा खेळ असतो. लपंडाव असतो. तो शब्दरूपाने उभा आहे. आकाश हे सावयव अतएव अशाश्वत ते आकाश अवकाशाची पोकळीची इच्छा बाळगून असते. या उलट सद्गुरू म्हणजे भरिव आकाश, अपरिछिन्न, केवलज्ञानमय चिदाकाश. प्रमाणबद्ध शिल्पाच्या भाषेत पोकळी ही आकाराच्या भरिवपणावर अवलंबून असते. जसा संस्कृतीचा ठाशिवपणा हा समाजातील कलागुणावरून, साहित्यावरून ओळखला जातो.

कापुराचिया थळिवा । नुरेचि आगिची बरवा
नुरेचि रूपनावा । तैसे यथा
गुणाचिया सोइरिका । निर्वाहे दिपकलिका
ते का राहे पुळीका । कापुराचिया

ह्या ओव्यांमधील जी चित्रमयता आहे ती किती पारदर्शक तशीच सजातिय रंगसंगती आहे व परस्परविरोधी आहे. कापराच्या वडीवर अग्नीची शोभा फार वेळ राहन नाही. ह्या क्षणकाल दृश्यात कापराचा पांढरा रंग व ज्योतीचा निळा रंग फारच कमी अशी पिवळसर झाक म्हणजे सफेद, निळा, पिवळा ही सजातिय रंगसंगती. परंतु परस्परविरोधी वाद हा विषय कलास्वादाचा एक भाग आहे. अगदी आलेपाक किंवा गुळआंबा खाल्यासारखा गोड-आंबट-तिखट. सजातिय रंगसंगतीच्याउदाहरणाचा दुसरा प्रकार मात्र विरोधी छटाच्या देखाव्याने रंगवलेली ओवी.

तमातेजा काही। परस्परे निळे नाही
परिसुर्याचा ठाई। सुर्यचि होये
सुवर्ण आणि लेणे। वसते येके सुवर्णे
का चंद्र आणि चांदिणे। चंद्रिचि जेणी

काळोख आणि प्रकाश यांचे एकमेकाशी चांगले नाते नाही. पण सुर्याचे घरी फक्त सुर्यच असतो. काळोख आणि प्रकाश येथे सुर्यरूपच होतात. इथे विरोध मिटून एकत्व निर्माण होते. म्हणजेच दोन अलग रंगसंगतीचे एकरूप होणे आहे. ही सौंदर्याची, कलेची समिक्षा ज्ञानदेवांनी तेव्हाच लिहून ठेवली आहे परंतु विसाव्या शतकात सौंदर्यशास्त्राची व्याख्या पाश्चिमात्य वाऱ्याने वाहून नेली. तिचा आस्वाद घेण्यासाठी वरोळ सुटला पाहिजे म्हणजे पूर्वेकडचे सौंदर्य दिसेल. वाऱ्याने वाहून आणलेला पावसाचा मारा ही धों धों लागेल.

शिल्प बनविण्यासाठी जड वस्तूंचा म्हणजे खनिजांचा म्हणा किंवा चिखलमातीचा म्हणा उपयोग करूनच आकार भरीव करता त्यासाठी लागणारी द्रव्यरूप वायुरूप घटके उपयुक्त असतात. त्यांची ओळख असणे हे उत्तम शिल्पकाराचा गुण असतो. पुढील ओव्यांमध्ये ताबडतोब लक्षात येते की शिल्पाची घडण कशी करावी किंवा कशी असू शकते :

कांती काठिण्य कनक। तिहीचे कनक मात्र येक
द्रावो गोवी पियुष। पियुषचि
उजाळू दृति मार्दव। येया तिहीचि उणिव
हे देखजे सावेव। कापुरी येकी

चित्राची मांडणी उभी करावी की आडवी की भौमितिक यासाठी पुढील ओवीमधून (डिझाईनचे) मांडणीचे प्रकार लक्षात राहतील.

तेव्हा वरसोनि मेघु। समुद्र होऊनिया दोघु
सरे दाऊनी मार्गु। हारतसे जैसा

यात (मेघ) ढग, पाऊस, पाण्याचा प्रवाह, नदीनाले, डोंगर, ओहळ, समुद्र यांची मांडणी चित्रात आहे तशीच केली तरी ते चित्र तुम्ही पक्षाच्या डोळ्याने चितारता. त्याचा परस्पेक्टीव बिंदु किंवा केंद्र पक्षासारखे फिरले किंवा उडाले की मांडणीत विविधता येते. चित्राचा आस्वाद घ्यायचा आहे त्याचे सौंदर्य प्राशन करायचे आहे त्यासाठी एखाद्या चित्राची समिक्षा न होता प्रेक्षकाला त्याचा स्वाद मिळून जातो तो कसा तर :

फळविये फळ सुके। फळ नाशे रसू पाके
तो ही रसु उपखे। तृप्तिदानी

फळ निर्माण होत आणि फुल वाळून जाते. फळातून रससिध्द होतो आणि तो रस इतरांना तृप्ती देण्यात खर्च होतो.

चित्रामध्ये, शिल्पामध्ये कल्पनांचा भाग हा मांडणी सोब महत्वाचा असतो. मांडणीचे वेगवेगळे प्रकार रंगसंगतीप्रमाणे असतात परंतु कल्पनांना प्रकारामध्ये बांधता येत नाही. त्या स्वैर असतात, स्वतंत्र असतात. त्याची फार उदाहरणे ओव्यांमध्ये आहेत. उदा. ऊस कापला नाही तरी रस तेथे असतो. वीणा सिध्द झाली नाही तरी ती पावते. नाद अनुच्यारित असतो. फुलाच्या गर्भात मद्य तयार झाले नाही तोपावेतो मद्यालाच भ्रमर व्हावे लागते. स्वयंपाक तयार

झाला नाही तो पावेतो गोडी, चव कशा स्वरूपाची असे ते कळत नसते.

पुढील ओव्यांमध्ये अतिवास्तववाद-कल्पनावाद यांची उदाहरणे आहेत किंवा अभास्त चित्रमयता आहे. हा अतिवास्तववादी, दृश्यानुभव कोणत्या कलासौंदर्याच्या व्याख्येत आहे ! आकाशातील इंद्रधनुष्य दिसते तसे जर खरोखरीचे असते तर कोण धनुर्धर त्यावर बाण चढविणार नाही ! किंवा कोणता कलाकार प्रभावित होणार नाही.

इंद्रधनुषासिते। कवण घनुई न घालिते
ते दिसे तैसे होते। साथ जशी

प्राशनाच्या चमत्कारासाठी अगस्ति ऋषीला मृगजळ जर चालले असते तर तर्कशास्त्राच्या साह्याने नाश करता आला असता. स्वप्नवादाची उदाहरणे तर फारच सापडतात. ती चांगल्या काव्याची उदाहरणे आहेत. तशीच संपूर्ण कलाशैली सादर करता येईल एवढी ती एकसंघ आहेत. पहारीने सावलीला ढुसकणे त्यामुळे जमिनीला खड्डा, आकाशाची पोकळी, गदगदा हलवणे त्यामुळे हात लुळा पडणे, मृगजळातील पाणी पिणे, आकाशाला मिठी मारणे, आरशातील प्रतिबिंबाचे चुंबन घेणे, बोकडाच्या गळ्याजवळ असलेल्या स्तनांतून (अजागलस्तनातून) दूध काढणे, गुडघ्याला असलेल्या डोळ्यांनी मार्गप्रतिक्षा करणे, सांजवेळ उन्हात वाळवून तिची पुड करणे, जांभई पाट्यावर वाटणे, त्यात आळ कालवणे आणि जाडजुड देहाला पाजणे. पाटातून वाहणारे पाणी माघारी फिरवणे, जमिनीवर पडलेली सावली उलथून टाकणे, वाऱ्याचे तंतू घेऊन सुखाने दोर वळीत बसणे, बागुलबुवाला ठार करणे, प्रतिबिंब पदरात बांधणे, तळहातावरील केस ऐटीत विंचरत बसणे, घटाचा आभाव फोडून टाकणे, आकाशाला आलेली फुले तोडणे, सशाचे शिंग अनायसे मोडणे, कापराचा कोळसा करणे, रत्नदिवावरील काजळ धरणे, वंध्यापुत्राचा सोहळा आनंदाने साजरा करणे, अमावस्येच्या दिवशी उगवलेल्या चंद्राच्या किरणांनी पाताळातील चकोर पोसणे, मृगजळातील जलचरे पकडणे.

शब्द हा स्मरण करून देण्यासाठी असतो. हे चित्र किंवा आकार जाणीव करून देण्यासाठी असते. प्रेरणेच्या उत्स्फुर्त जाणीवेला जागेपण आले की आविष्काराच्या भिंती रंगायला सुरूवात होते. कलेचा विकास होत राहिला तर संस्कृती उच्च गणली जाते. संगीतातील लय ठेका किर्तनातून नाचून गाऊन शिल्प उभी राहतात. मात्र ज्ञानदेवांच्या अनुभव अमृतात किती अमुर्त शिल्प उभी आहेत. तुकाराम महाराजांच्या गाथेत विठ्ठलाची किती व्यक्तिचित्र आहेत. तशीच रंगांच्या बाबत :

आनंदाचे डोही आनंद तरंग
आनंदच अंग आनंदाचे
रक्त श्वेत कृष्ण पीतप्रभा भिन्न
चिन्मय अंतन मध्ये डोळा
सुनील प्रकाश उदैजला दिन
अमृताचे पान जीवनकळा
वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे
पक्षी ही सुस्वरे आळविती

भास्कर हांडे
२० मार्च १९९७, पुणे.

मुलाखत

काय करता येईल आयुष्याच्या कॅनव्हाससाठी अजून कुठले रंग

कवितेची सोबत आहेत याशिवाय इतर माध्यम ? उदा. नाटक, सिनेमा, नृत्य.
परदेशातच स्थायिक होण्यामागची मानसिकता, गरज, अपेक्षा इ.

जे.जे.चं वातावरण बदलतं वातावरण आणि त्या परिस्थितीला आपण मॅच झाल्याची जाणीव केव्हा झाली कविता कुठं भेटली ?

गाव सोडून मुंबईत आल्यावर गावगाड्यातून बाहेर आल्याचा अनुभव
मुंबई शहर अंगावर कसं घेतलं त्यातली स्थित्यंतर आणि जे.जे.तला प्रवेश

जे.जे.तून बाहेर पडताना आयुष्याचं नेमकं चित्र काय होतं त्यातलं किती लाभलं ?
किती इच्छा नसताना सोडावं भोगावं लागतं ?

परदेशगमन, त्यातल्या अडचणी, अपेक्षा, अपेक्षाभंग इ.

इथल्या मातीचा संपर्क तुटल्यावरचा अंतराळातला अनुभव, हॉलंडमधले दिवस
अनिश्चितता, एक दृष्टी : पुनःबस्तान

आता सेटल काय वाटतं

जे.जे तून डिप्लोमा घेतला. कामाची चिंता त्या काळात करावी लागली नव्हती. सगळे कसे वेळेच्या अगोदरच आखले जात होते. १९ ला परिक्षा संपते आणि २२ मे ला कामावर हजर होतो. कामाचा प्रश्न नव्हता मात्र जे.जे.तून मिळालेल्या शिक्षणावर संपूर्ण आयुष्यात भाकरी मिळविण्याची चिंता मिटली असे वाटत असतानाच बौद्धीक भूक वाढलेली आपली आजवरच्या शिक्षणाची अपूर्णता हळूहळू जाणवू लागली. मर्यादा ओळखू येऊ लागल्या. त्यात यानंतरही शिक्षण एका संपूर्ण विषयाचे ५ वर्षात बाकीचे विषय झाले आणि पेंटीगचा अभाव वाटू लागला. त्यातली खोली समजून घेण्याची इच्छा प्रबळ होऊ लागली. ह्या प्रक्रियेत आजवरच्या मित्रांचे विचार सगळ्या बौद्धिक झेपा घेण्याचे मनसुबे ह्या सर्वांसाठी प्रथम आपला पाया भक्कम असणे महत्वाचे. स्वत:च्या बौद्धीक अस्तित्वाची गरज भासू लागली व त्याचे प्रयत्न सुरू झाले शिवाय कॉलेजमधील एक काळ संपला होता ज्याला त्याला आपले काम, घर काहीना स्वत:चे अस्तित्व मग ते आर्थिक, बौद्धिक जाणीवा वेगवेगळ्या होऊ लागल्या. यातच आयुष्याचे एक चित्र तयार होण्यास उशीर दिसू लागला. मात्र एक ठराविक चित्र तयार होऊ लागले की शिक्षण किंवा अभ्यास ह्या ठिकाणाहून दूर जाऊन करावयाचा. आजवरच्या जे.जे.तून केलेल्या स्टडीटूर, त्यातून पाहिलेला संपूर्ण उत्तर भारत त्यातून एक वेगळाच अभ्यास होऊ घातला. प्रवासाचे आकर्षण नेहमीच होऊ लागले, नोकरी तशी पूर्णवेळ नव्हतीच. मात्र अद्यापपर्यंत सलग अशी १३ महिने एकाच ठिकाणी नोकरी झाली होती. ह्यातच वेगळे समाधान जाणवू लागले.

शिक्षणाला सुरूवात ठरल्याप्रमाणे झाली. परदेशात अर्ज केले. अपेक्षेप्रमाणे पत्र आली. प्रवेशासाठी ट्रान्सफरन्सीज पाठवल्या. प्रवेश पक्का झाला. मग त्यासाठी पैसा, भाषा या सर्वांची तयारी चालू झाली. सर्व योग्य वेळेत झाले. शेवटी व्हिसासाठी सर्व कागदपत्रे दखल करवून घेतली. ह्या दीड वर्षाच्या प्रवासात स्टुडिओ खोलण्याचे स्वप्न तसेच सोडून द्यावे लागले. कामे चालू झाली होती त्याक्षणी ह्यात थोडेफार (दु:ख) असमाधान वाटले. पण ते तात्पुरतेच आज ते वाटत नाही. तो आज पोरखेळ वाटू लागला. मात्र पश्चाताप कधीच नाही. कारण तो स्वभावातच नाही जे झाले ते झाले पुढे ते टाळणे एवढेच आपल्या हातात असते. परंतु जे काही हाती मिळाले त्यात समाधान आहे.

यात ॲनिमेशन, व्हिडीओसाठी सारखी फार प्रबळ इच्छा परंतु त्यासाठी लागणारी आर्थिक आवक ही परदेशात शक्य होत नव्हती. जीवन जगणे आणि शिक्षण त्यातल्या त्यात झेपा फारच होऊ लागल्या. याची जाणीव होऊ लागली आणि ते त्यावेळी शिक्षण घेतले अभ्यास केला परंतु ह्यात इच्छा नसताना सोडावे लागले किंवा थांबवावे लागले. ह्याची रूखरूख.

परदेशगमन ते ही रितसर मार्गान. म्हणजे ते वाट पहाणे ह्याची सवय लावून घेणे. ह्यासारख्या गोष्टी पुढे टाळणे आणि सतत टाळण्याची काळजी घेतो. यात नोकरशाहीचा अजस्त्र पद्धतीचा अनुभव आला तो समजावून घेऊ लागलो. त्यातल्या प्रत्येक शंकेचे निरसन हे कागदी उत्तरानेच पुरवून दिले. ह्यातच माणसाला ओळखण्यासाठी कागद हे महत्वाचे आहे हे समजले आणि माणसाचे महत्व शून्य आहे याची जाणीव होऊ लागली. तेथे फक्त कागद बोलतात. ती लिहीणारे फक्त शिक्के असतात. हुद्दे असतात ह्या कागदामध्ये माणसाची तळमळ जखडून पडत असते. अपेक्षा तशी अभ्यास करण्याची ती त्याप्रमाणे पूर्ण झाली व नवीन माणसांना भेटण्याचे योग पुन्हा पहिल्या गोष्टींची उजळणी होत असे वाटू लागली पण त्यातला ओलेपणा व सुकेपणा ह्यांची

ओळख होऊ लागली. कुणाची प्रामाणिकपणे ओळख करून घेण्याची वेळ येऊ लागली ह्यात थोडे रिझर्व्ह झाल्यासारखे वाटू लागले.

विमानात नसताना किंवा विमानतळावर एक वेगळा हुरूप आला होता. हे सगळे काही होत आहे यावर विश्वास बसत नव्हता यात झालेली दिलीप चित्रे यांची एक माणूस म्हणून ओळख ही वेगळीच होती. माणसे इतकी जवळची कशी होतात याचा उलगडा अद्याप होत नाही. याचेच एक सतत आश्चर्य आहे. सगळ्या प्रकारची माणसे भेटली फायदा (आर्थिक) उठवणारी त्यांचा खुला समाचारसुद्धा घेतला. ह्यात निर्मळ मैत्रीसाठी संजय पवार, रघुवीर कुलकर्णी यांची ओळख एक वेगळीच निव्वळ चांगुलपणा किंवा परखडपणा किती समाधानकारक असतो ह्याचे कौतुक स्वत:लाच वाटते. यांच्या सर्व शुभेच्छा हितचिंतन. यांचा एक आधार उडत्या विमानात होताच. अंतराळात कल्पना आणि झेपा यांचा मिलाफ झाल्यासारखे. आपण एका वेगळ्या वातावरणात प्रवेश करत असल्याची जाणीव एक प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात प्रवेश करताना झाला. माझी माणसे सर्व काही वेगळी ह्यात एक नावीन्यातील आनंद आणि पुन्हा परतण्याची घाई. या संमिश्र विचारांची धांदल झालेली असते.

हॉलंडमध्ये कॉलेजचे पहिले दिवस. एकदम जाणवलेली आर्थिक कमतरता उच्च राहणीमान. आदर्श वगैरे अशातला भाग नव्हता. फक्त पुन्हा मुंबईतील सुरूवातीचे दिवस आठवू लागले. तेथे रेस्टॉरंटमध्ये ताबडतोब पार्टटाईम काम मिळविण्याची घाई मात्र ह्यात वेटरच्या कामापेक्षा गोणी वगैरे उचलणे बरे वाटायचे. माणसांना जेवण वाढण्यापेक्षा बनविण्यात आनंद वाटू लागला. सफाई सर्व काही सुरूवातीचे सहा महिने. सहा महिन्यात एकांत जास्त मिळू लागला. त्यात लिखाण जास्त जवळचे वाटू लागले. नवीन भाषांची ओळख सर्व पुन्हा जुने दिवस चालू झाल्याचे वाटू लागले. तुलनात्मक विचार येऊ लागले.

स्त्री पुरूषातील संबंध हा जगातील सर्वात नाजूक भाग त्याला ओलांडून किंवा त्याच्याशिवाय कोणताही जीव जीवन उपभोगू शकत नाही. सर्व जग ह्याच बिंदुभोवती फिरते आहे. ह्यात आता नव्या जगाच्या कल्पनांमध्ये वावरतो आहे ते म्हणजे पुरूष पुरूष संबंध, स्त्री स्त्री संबंध, पुरूष स्त्री संबंध व त्यात जगणाऱ्या लोकांच्या वैचारिक देवाणघेवाणाची जी ओळख झाली यातून आपण फक्त निवडण्यावर अवलंबून असतो असे वाटते. जगात काहीही कोणताही संबंध अशक्य नाही. फक्त त्याची माहिती मिळणे आणि प्रत्यक्ष त्या समाजात राहणे ह्यामुळे वैचारिक तफावत मित्रांच्या नात्यागोत्यांच्या वाढली आहे. जे अशक्य आहे ते पाहिले आहे. आवडत नाही म्हणून अनुभवले नाही. त्याची घृणा येते. परंतु आपण आपल्याच बदलत्या नाकाला किंवा काना डोळ्याला काढून टाकू शकत नाही. तसेच अशा माणसांमध्ये अशा जगामध्ये जगायचे नाही. असे म्हणून कसे चालेल ह्यात जगण्याची सक्ती नाही परंतु ह्यात जगून जगण्याची आवड आहे हेच प्रदर्शित होते आहे.

स्त्रियांचे ही जग पाहीले आहे प्रत्येकीचे आई, बहिणी, भावजया, मामी, मावशा, मैत्रिणी, अगदी जिवाभावाच्या सुद्धा. मैत्रिणी दोन्ही जगातल्या. एकीकडे संस्कृतीने नात्यागोत्याने जखडलेल्या व दुसऱ्या जगात एकदम सैर पण ह्या सुरक्षितता शोधणाऱ्याच. त्यामुळे माणूस तेथून एकच आहे. सुरक्षित आर्थिक जीवन हा त्यातला मूळ गाभा. तो झुगारून स्त्री जगण्याचा प्रयत्न करू पाहते आहे. अगदी हॉलंडमध्ये मला तरी वाटते जगात हॉलंडमध्येच हे झाले. सेक्स

रिव्हूलशन या कल्पना भारतात शक्य नाहीत परंतु बाकी उदाहरणे फार देता येतील मात्र ती समाजव्यवस्थेला घातक आहेत. त्यातील विस्कळीतपणा जाणवतो. परंतु आर्थिक बांधणीवर या प्रकारे रिव्हलूशन आधारलेले आहे. याची जाणीव होते. मात्र स्त्रीआणि पुरूष या दोघांचे संबंध बरोबरीचे असावेत. स्त्रीमुक्ती ही कल्पना पुरूषधार्जिण्या समाजव्यवस्थेत कितीही विस्तृत करून मांडली तरी पारंपारिकतेच्या बोजडपणामुळे ती बोथट राहील की काय असे वाटते. मात्र ह्या वाटण्यापेक्षा स्त्री ही जेवढी धाडसी असे त्यामानाने पुरूष तिच्यापुढे नेभळट ठरतो. धैर्यवान, शूर, धाडसी ह्यासारख्या पुरूषाच्या समोर पुरूषाला दिलेल्या स्त्रीच्या समोर पुरूष म्हणजे ताकतीचे, शारिरीक बलाचे तोल सम नसणे. मानसिकदृष्ट्या त्यांच्या समतोलाची कल्पना येते. तेथे सर्व समान असतात हयाचमुळे भारतातसुद्धा मातृप्रधान समाजव्यवस्था अद्यापपर्यंत तग धरून आहे. जिथे एक जीव स्वतंत्र आहे तेथे दुसराही स्वतंत्रच आहे आणि तो समान त्याच पातळीवर आहे. आपल्या समाजात स्त्रीमुक्ती ही व्यवस्थेवर आधारली आहे. तिचे बंध सैल होणे आहेच. परंतु रोजच्या उदाहरणाच्या जगात जगण्यापेक्षा वैयक्तिक विचारांच्या जगात जगणे महत्वाचे वाटते. इतिहास म्हणजे उदाहरणाचे पेव त्याचे स्थित्यंतर होणे मात्र स्थिती बदलून इतिहास घडवणे. हे वैयक्तिक विचाराने होऊ शकते.

स्त्रीमुक्तीसाठी समाज सुशिक्षित असूनसूद्धा पारंपारिकतेच्या जखड्यात गुंतलेला नको आहे असे वाटते. आजवरच्या आयुष्यात मित्र जसे मैत्रिचे मिळाले तसेच मैत्रिच्या मैत्रिणीसुद्धा आहेत. अगदी दिलखुलास कोणत्याही विषयावर बोलणाऱ्या आणि ज्यांच्याशी कोणताही आडपडदा न ठेवता. मात्र सर्व संबंधामुळे एक धूकीत वातावरणाचा आभास तयार होतो. त्याला आपणाला स्वत:ला दूर सारणे होत नाही. मैत्रिण एक असू शकते आणि शरीरसंबंध दुसरे असू शकतात का? ह्या उंबरठ्यावर उभे राहिल्यासारखे वाटते. एका समान वैचारिक पातळ्यांवर स्त्रीशी आलेला अनुभव हा चांगला आहे. संबंधाबद्दल सांगणे कठीण कारण ते अजून अनुभवायचे आहे. मात्र शारिरीक अडचणी संबंधात नसाव्यात. बाकीच्या इतर गोष्टींचा विचार करताना हा विषय तसा गहनच वाटतो. कारण प्रत्येकाची अशी स्वतंत्र संकल्पना असते रोमँटीक, सेक्सी, प्रेमळ, उदारमतवादी. ती स्त्रीची असणे आणि पुरूषाची असते. त्यांचा मेळ बसला की उर्वरित आयुष्याची चाल होते. बाकी सर्व समान असावे. त्यासोबत सर्व समंजस असावे हे महत्वाचे.

भारतीय जाहिरात कलेविषयी : एकतर जाहिरात कला ही फारच अलिकडील. त्यात भारताची सुरूवात ही अगदीच काही वर्षांची. मात्र ह्यातील वेग फार. कारण जगभरच्या एकंदर खरेदीविक्रीच्या व्यवहारात एकत्रितपणा आला आहे. आता जगातील सर्व शहरी लोकांची एक जमात झाली आहे आणि गावातील लोकांची झाली एकीकडची. मध्यमवर्गाची जगात झालेली वाढ आणि भारतातील कृषीप्रधान समाज त्यामुळे भारतात जाहिरात ही शहरापुरती मर्यादित राहीली होती. ती टी.व्ही.मुळे सर्वांपर्यंत पोहोचली आहे. येथील गिऱ्हाईक वर्गाला आकर्षित करण्यासाठी त्यांच्याच भाषेचा उपयोग महत्वाचा आहे. त्यांच्याच प्रतिकांचा उपयोग महत्वाचा आहे. ह्यात मोठी शहरे सोडली तर तसा प्रसार लहान लहान शहरांमध्ये झाला नाही. मात्र आज सर्वांना जाहिरातीचे महत्व समजले आहे. उत्पादकाची सुरूवात नियोजन व जाहीरात याच्यानेच होऊ लागली आहे. त्याची भारतीय पद्धतीसुद्धा अंगीकरल्या आहेत. ह्या उणीवा थोड्याफार आहेत कारण इंग्रजीचा असलेला प्रभाव तसाच नवीन नवीन कल्पनांच्या द्वारे जाहिरातीचा लहान

मुलांवर झालेला प्रभाव ही सर्व पद्धतीत परिणामकारक ठरत आहे. एक मात्र प्रकर्षाने जाणवते ते हे की भारतीय जाहिरात कलेत अनुकरणाला जास्त महत्व दिले जाते. हे आकसाने म्हणणे नाही. दाखले देणे शक्य आहे. अनुकरणाचे प्रमाण नवनिर्मितीचे जास्त आहे. एकंदर जागतिक जाहिरात क्षेत्रात ब्रिटीश जाहिरातीचे व अमेरिकन जाहिराचे प्रभाव इतर देशांवर खास करून कोलोनियल व तिसऱ्या जगावर तसेच युरोपिअन राष्ट्रांवर जाणवतो.

भारतीय पेंटींग : भारतीय पेंटींग व एकंदरच ललित कलांच्याबाबत पूर्वीच्या राजाश्रयाखालील पद्धती जाऊन नवीन प्रवाहात आलेले कलाकार व त्यानंतर स्वातंत्र्योतर कलाकार यांच्यात वेगवेगळी मते असले तरी स्वातंत्र्य अस्तित्वाची चित्रकला, शिल्पकला ह्यात फार कमी लोकांचा अभिर्भाव आहे. एकंदरच भारतात संगीत हा विषय सर्व बाजूने विचार झाला. त्याच्यामागोमाग शिल्पकला व वास्तूकला यांचा वेगवेगळ्या काळात झाला. यात पेंटींगकडे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते. त्यात काल्पनिक आविष्काराच्या बरोबरीत जाण्याचा प्रयत्न काहीनी केला. मात्र जीवनाभिमुख आलेखाचा अभ्यास पणीकर, पळशीकर सारख्या प्रतिभावंतानी केला. आणि आताच्या काळाबद्दल (समकालीन) जास्त काही सांगणे नाही. कारण युरोपातील, अमेरिकेतील नवीन नवीन प्रवाहात ज्यांची कुणाची नावे घ्यायची त्यात त्याच दर्जाचेही काम भारतात बरेच लोक करू लागले आहेत. त्यामानाने महाराष्ट्र उजवा ठरत आलेला आहे. मुंबईसारख्या आधुनिक शहरापासून मिळालेले कॉस्मोपॉलिटन अनुभव व त्या दगदगीत मुंबईच्या पार्श्वभूमीवरील ग्रामीण महाराष्ट्राची त्यांच्या लोककलांची. इथे गॅलऱ्यांच्या अभाव जाणवतो युरोपच्या प्रमाणात फारच कमी लोकवस्तीच्या मानाने तर विचारच करायला नको. परंतु एकंदर शहरात किती गॅलऱ्या व प्रदर्शनाची ठिकाणी ॲमस्टरडॅमसारख्या शहरात ११० च्या वर गॅलऱ्या तर त्याच्या दसपटीने (लोकसंख्येच्या मानाने) मोठ्या मुंबई शहरात अवघ्या १० सुद्धा रेग्यूलर कान्टेपररी आर्ट प्रदर्शित गॅलऱ्या नाहीत जोपर्यंत गॅलऱ्या होत नाहीत तोपर्यंत प्रेक्षकांची रूची वाढत नाही व प्रेक्षक तयार करावयाचा असतो. त्यासाठी कलेच्या इतिहासकारांची जरूर आहे. येथे फक्त कलाकार तयार करण्याचे कारखाने आहेत मात्र कलाकार जिवंत ठेवणारी शेते नाहीत. त्यामुळे संपूर्ण कलेबद्दल असलेले औदासिन्यच जास्त दिसते. कलावंताला स्वतंत्र प्रतिभेचा तयार येथे समाजच होऊ देत नाही. त्यासाठी लागणारी सर्व मानसिक तयारी मारली जाते की कलाकारात अभाव असतो ह्या प्रतिभेचा ? भारतात मटेरियल फारच आहे ते फक्त शोधणे महत्वाचे आहे फक्त फॅक्टरीतून आलेले रंगच महत्वाचे नाहीत. परंतु ब्रिटीश विचारसरणीमुळे सध्यापर्यंत परदेशी विचारांचा पगडा येथील ठिकाणी दिसतो. तो सर्व देशामध्ये ह्यात प्रेमाने आपल्या जमिनीची माती रंग म्हणून जरी कॅनव्हासवर लावली ती तितकीच प्रभावी असते. जितके विल्सन न्यूटनचे रंग असतात कलाकार निर्मितीपेक्षा तांत्रिक बाबीत जास्त जखडला जात आहे हे एकंदरीत परिस्थितीहून जाणवते. इथल्या शिक्षणात कोणताही अभाव जाणवत नाही. कारण येथे शिकण्यासारखे आपले आयुष्यच असते. त्यात अनुकरणापेक्षा अभिव्यक्ती अभिप्रेत असते. शिक्षण घेताना ह्या गोष्टींचा कुठे वापर करायचा हे सांगणारे शिक्षक भरपूर आहेत. मात्र कोणत्या ठिकाणी सुरूवात करायची हे विद्यार्थ्यांवर अवलंबून आहे किंवा शिकणाऱ्यावर अवलंबून आहे. युरोपातही शिक्षणात विशेष काही नाही हे तेथे शिक्षण घेतल्यानंतर हेव्यादाव्याचा अनुभव घेतला. जो जे.जे. मध्ये मिळाला खरेतर कलाकारांच्या अस्थिर मनांच्या

ह्या वावटळी सदैव ॲकेडमिक क्षेत्रात जगभर उठत असतात त्याला अपवाद असे कोणतेही क्षेत्र नाही किंवा देश नाहीत.

आयुष्याच्या कॅनव्हाससाठी अजून बरेच रंग आहे. परंतु मर्यादा आहेत. संगीताची आवड वाढत आहे सर्व प्रकारच्या लोकसंगीत व क्लासिकलकडे ओढा वाढत आहे. शिल्पकलेकडे आहे. प्रवास चालूच आहे. संगीत जाणून घेणे.

कवितेच्या सोबत काही व्हिडीओ, फिल्मकडे वळण्याची तयारी चालू आहेतच. फक्त वेळ आणि संधी याची वाट पाहणे, ॲनिमेशनचे डोक्यात आहे परंतु सांघिक कामात परदेशात ठराविक मित्रांचा अभावव जाणवतो.

परदेशात स्थायिक होण्यामागची कारणे काही एक वेगळी नाहीत. जेथे काम चालू केले आहे तेथून वारंवार दूसरीकडे जाणे शक्य नाही आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यातील मानसिक त्रास ह्या अगोदरच अनुभवला आहे त्यामुळे पुन्हा अशा काही म्हणण्याला थारा नाही. आणि जेव्हा या प्रकारचा निर्णय घेतला त्यात सर्व ठिकाणी काम करता येते. कोणते असे बंधन नाही तशी गरज फक्त नोकरशाहीसाठी फक्त आहे. माणसाला विश्वात कुठेही जाता येते किंवा जगभर फिरता येते मात्र त्याला कोणत्यातरी एका ठिकाणी वास्तव करणे नाही. म्हटले तरी जरूरीचे वाटू लागले. निदान आजच्या या जगात अगदीच हवेत विरून जाता येत नाही जर अस्तित्व ठेवायचे असेल तर.

आयुष्यात आता अपेक्षा फक्त समंजस वृत्तीने जगण्याची आहे सगळ्या दगदगीतून, कोलाहलातून मरेपर्यंत असेच काम करत राहण्याची आहे. तेही स्वत:चे अस्तित्व टिकवून आणि ललितकलेची सेवा करत.

सहा महिने उलटल्यावर तेथील माणसात मिसळणे. पोर्ट्रेटची कामे मिळविणे. एक आर्टिस्ट म्हणून ओळख करून दिली. येथे जात पात नव्हती मात्र येथे रंगीत कारभार होता. त्याची एक नवीन ओळख. काळी माणसे गोरी माणसे पिवळी, ब्राऊन वगैरे ह्यात जातपात गाडली गेली अगदी त्याचा मागमूस राहीला नाही असे वाटू लागले.

मात्र मित्रांची मैत्री मिळविण्याची हौस चालूच राहीली अद्याप सगळीकडे तसे मिळतात याचे समाधान आहे. तेथे सहा महिन्यातच व्यवस्थित हळूहळू आर्थिक स्थैरता वाटू लागली बँकेत वगैरे पैसे ठेवण्याची सवय झाली. बॅलन्स आयुष्य करून ठेवले येथे पैसे उधार मागणे हा प्रकार नव्हता. आणि कोण देणार म्हणून दक्षता घेणे महत्वाचे.

ह्यात अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर मला व्यावसायिक अनिश्चितता वाटू लागली कारण भारतातही सर्व दुरावल्यासारखे वागू लागले. कारण यात आता कमर्शिअलचे काम की पेंटींग मॉन्यूमेंटल डिझाईनचे काम ह्यात काहीतरी पायाखालचे निसत आहे असा उगाच अभास. पुन्हा ॲनिमेशन व्हीडीओचा अभ्यास सुरू मात्र यावेळेस नोकरी वगैरे शोधण्यास सुरूवात. म्हणजे दुय्यम विचारात होलपट होऊ लागली सर्व प्रगल्भ विश्व आणि विषय त्यांचे मोठेपण आणि आपली आयुष्याची सुरूवात ह्यात दोलायमान झाल्यासारखे वाटू लागणे म्हणजे कोणत्यातरी गर्तेत सापडण्याची चिन्हे दिसू लागली. जे टाळत होतो ते समोर येऊन उभे ठाकले. कारण परदेशात नोकरी म्हणजे पुन्हा सर्व कागदशाहीचा नोकरशाहीचा तडाखा आणि फटके येथे

बेकायदेशीर जगाची ओळख होऊ लागली. आणि फक्त कागद ह महत्वाचे आहे याची पुन्हा खात्री पटली.

ह्या सर्वाला एकदाचे सामारे जायचे याचा ठाम निश्चय केला आणि त्या दृष्टीने पावले उचलली लांब पल्ल्याच्या प्रवासाची तयारी करून पेंटींग्ज करायला सुरूवात केली. जे वाटते ते कागदावर कॅनव्हावर मांडायला सुरूवात केली. यात बऱ्याच अडचणी येऊनसुद्धा एकदाची पेंटींगसाटी गॅलरी मिळाली. प्रदर्शने चालू झाली. येथेच संपूर्ण आयुष्याचा आत्मविश्वास एकवटला व निश्चित प्रवासाला सुरूवात झाली. मार्ग सापडल्याची जाणीव झाली. त्यातल्या त्यात मोठा उत्साह आणि काम करण्याची तडफ पण एकाकी जीवनातील आत्मविश्वास, अस्थिरता, अनिश्चितता ह्यांचे प्रतिबिंब दिसू लागले आणि आयुष्याचा अर्थ कळाल्याची जाणीव झाली. माणूस किती केविलवाणा असतो ह्या सर्व परिस्थितीत त्याच्याबद्दलचे गैरसमज फार असतात मग ते चांगले किंवा वाईट. या सर्वांची गरज त्याला लागत नाही. येथे आयुष्य जगायचं असते हे समजले. तक्रारी नसल्यात हेही त्यातच.

अजून सेटल असे काहीच वाटत नाही. ह्या सर्व न वाटण्यातील अंतरात बरेच अंतर चालून यावे लागले मी किती भागात विभागलो गेलो आहे ह्याचे सिंहावलोकन केले की मग समजते. सर्वप्रथम कुटुंब, मुंबईच मित्र, व्यावसायिक मित्र परदेशातील त्याच प्रकारचे मैत्रीचे मित्र व व्यावसायिक मित्र ह्या आणखी एक नवीन लागण होते ती चाहत्यांची त्याचे प्रेम सहानुभूती ह्यांचाही एक प्रचंड जंजाळ उभा राहतो. कुटुंबात मी, भाऊ, मुलगा वगैरे सर्व असतो. सर्वांचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलला असतो. आपण तोच असतो. मात्र माणसांच्या नातेवाईकांच्या अपेक्षा बदलत्या असतात. मित्रांची नजर बदललेली असते. ह्यात मैत्रीचे मित्र जसे आहेत तसे जवळचे वाटतात. एवढेच मित्र मैत्रिणींचा गोतावळा हा नातेवाईकांच्या गोतावळ्यापेक्षा आजतरी जवळचा वाटतो. कारण कुटुंब म्हटले की त्यातील सर्व नियम लागू पडतात ते प्रत्येकजण २ कौटुंबिक वेगळा होईपर्यंत कुटुबाची स्थित्यंतरे फार असतात. यातून जायचे नाही म्हटले तरीते कटू अनुभव पचवावेच लागतात. याची जाणीव आज होते आहे. शेवटी नाती गोती भाऊ बहीण सर्व काही झूठ आहे असे वाटते. यात मनुष्य हा फक्त एकटाच आहे. समाजाने लादलेली सर्व बंधने मान्यही असतात परंतु ती किती फोल असतात हे त्यालाही समजते. तरी त्याच वर्तुळात अडकून राहण्याची त्याची वृत्ती बदलत नाही. मात्र प्रयत्न चालू असतात. एका वर्तुळातून निघून दुसऱ्या वर्तुळात जाण्याचा काळ वेगवेगळ्या प्रकारे असतो. आईवडील मुलाचा संसार चालू करून देतात यात वर्तुळे एकमेकात जखडली असतात. कुटुंब विभक्त होऊन संसार चालू न झालेल्याची स्थिती दोन वर्तुळातील अंतराने सैल ठेवलेली असते. यात जे अंतर असते त्यातील कंपने म्हणजे अखिल नाती गोती यांचे धागे जळून गेलेल्या अवस्थेचा प्रत्यय. या फक्त एक जीव असतो हेच मान्य करावे लागेल मग त्याच जीवाने निर्णय घेऊन पुन्हा समाजाशी बांधीलकी जोडायची की नाही हे ठरवायचे असते.

जीवनातील मूल्य, निती, धर्म हा सर्व एक जीव सांधा सांधण्याच्या धडपडीत असतो. मात्र प्रगल्भ प्रामाणिक आणि निव्वळ प्रामाणिक ह्यात फरक असण्यासारखे वाटते. मुल्याची पायदळ झाल्याची उदाहरणे पहाण्यापेक्षा ती परिस्थितीनीरूप अनुभवताना तुच्छ वाटतात. प्रामाणिकांच्या जागात निती सर्व समाजाने लादलेली असते. धर्म ही वस्तूस्थितीच नाही याचे

प्रत्यंतर येते. जो जे विचार करील व त्यानुसार वागेल आणि यातील मनुष्यामनुष्यातील तफावत ह्यावरून धर्माची व्याख्या बदलत राहते. माणसाचे विचार अन आचरणात धर्म किती वेळा हाताबाहेर जातो याचा प्रत्यय वेळोवेळी येतो. तरीही मैत्री, नाती, प्रेम यातून मूल्य निती धर्म ह्याचा एक देखावा एका माणसापुरताच असतो. आधीच्या ह्या कल्पना सर्व शोभिवंत दिसतात. त्याच्या सान्निध्यात जगताना प्रांताप्रांताच्या अंतराची झळ जेव्हा पोहचते तेव्हा यांच्या संकल्पना बदलतात. एका स्थितीवर राहण्याची तळमळ आणि स्थित्यंतराची पद्धत ह्या दोन्ही गोष्टी अन् तिसरा त्रयस्थ घोळका (समाज) किंवा एक जीव ह्याची संकल्पना ज्यांना समजते त्यांना जगणे समजावे एवढीच इच्छा. मग राग, लोभ, द्वेष वगैरे शारीरिक स्वभावावर सोडून द्यायच्या. शरीर, मन, ह्या परस्परविरोधी तशाच संलग्न. एक मनुष्य व समाज. हे ही तेच.